**नियमीत दिवाणी दावा नं.२८३/२०१३ मधील नि.९७ खालील आदेश**
**CNR : MHSN06001354-2013**
**(रावसाहेब तारदाळे वि. तात्यासाहेब तारदाळे आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द सरस–निरस मानाने तुटक वाटप होऊन प्रत्यक्ष कब्जा मिळणे करिता दाखल केलेला आहे. सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे यांना खालील प्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

**प्रतिवादी क्र.०२ – दादासो बाबुराव तारदाळे (मयत)**

**२/१ श्रीमती वर्षाराणी दासासो तारदाळे**
व. व. ४८, व्यवसाय घरकाम

**२/२ श्री. हरीष दादासो तारदाळे**
व. व. २४. व्यवसाय शेती

**२/३ श्री. हर्षद दादासो तारदाळे**
व. व. २८, व्यवसाय शेती -
सर्व रा. मालगांव ता. मिरज जि. सांगली.

मयत दादासो बाबूराव तारदाळे यांना वर नमुद केलेप्रमाणे २/१ ह्या पत्नी असून २/2 ते २/३ ही मुले या नात्याने कायदेशीर वारस आहेत. याशिवाय मयत दादासो बाबूराव तारदाळे यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**०२.** सदर दावे कामी मयताचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. मयत प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबूराव तारदाळे यांच्या नावापुढे "मयत" असा शेरा होऊन त्यांच्या वारसांची नावे अभिलेखावर दाखल करणेस व तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मयत दादासाहेब बाबूराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले असून कायदयानुसार मयताचे वारस अभिलेखावर आणणेकरिता ९० दिवसांचा कालावधी आहे. त्यानंतर तेथून पुढे ६० दिवसांच्या आत ॲबेटमेंट सेट

असाईड मिळणेकरिता मुदत आहे. परंतु याकामी अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणेकरिता जास्त कालावधी झाला असलेने, त्यासाठी विलंब माफीचा अर्ज स्वतंत्र दाखल केलेला आहे. या कामी कोरोना (कोव्हीड-१९) या महामारीच्या संसर्गजन्य आजारामुळे राज्यामध्ये लॉकडॉऊन झालेला होता व त्याकाळात कोर्ट कामकाज देखील बरेच दिवस बंद होते, यातील मुळ वादी रावसाहेब बाबुराव तारदाळे हे देखील दि.०१/०२/२०२० रोजी मयत झाले असलेने, तसेच त्यांची पत्नी छाया रावसाहेब तारदाळे ह्या आजारी होत्या व सुशांत रावसाहेब तारदाळे यांचा अपघात झालेला असल्यामुळे त्यांच्या दोघांचेवर औषधोपचार चालू होते. त्यामुळे विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणून-बुजून केलेला नाही. न्यायाच्या दृष्टीने मयत प्रतिवादी नं.०२ दादासो बाबूराव तारदाळे यांचे वारस अभिलेखावर आणणे करिता झालेला विलंब माफ होऊन वारस अभिलेखावर आणणेस व तशी अभिलेखावर दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती करतात.

**०३.** सदर प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, वादींनी दाखल केलेल्या वारस अभिलेखावर आणण्याच्या अर्जास वेगळा विलंब माफीचा अर्ज दिलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती करतात.

**०४.** सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मुदतीच्या कायद्याचा विचार करता मयत प्रतिवादी क्र.०२ चे वारस ९० दिवसाच्या आत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. सदरचे वारस अभिलेखावर घेणेकरिता वादींना विलंब झालेला आहे. सदर कामी प्रतिवादी नं.०२ यांचे वारस अभिलेखावर आणणे करिता झालेला विलंब माफ होऊन वारस अभिलेखावर आणणेस व तशी अभिलेखावर दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे तसेच त्या कालावधीमध्ये कोर्ट कामकाज बंद असल्यामुळे वादींना प्रतिवादी क्र.०२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु सदर कामी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी कोवीड–१९ आजाराच्या प्रादुर्भावामुळे मुदतीचा कालावधी वाढवण्याबाबत मार्गदर्शक तत्वे जाहीर केली. सदर मार्गदर्शक तत्वे लक्षात घेता, वादी

यांनी अर्जात नमूद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, वादींना वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन, वारस अभिलेखावर घेणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचीत वाटत आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादींचा नि. क्र. ९७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबूराव तारदाळे यांच्या नावापुढे "मयत" असा शेरा मारुन त्यांच्या वारसांना सदर कामी अभिलेखावर आणावे. त्याअनुषंगाने आज पासून १४ दिवसाच्या आत नि.क्र.०१ वर दुरुस्ती करुन पुढील कायदेशीर पूर्तता करावी.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI

Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2023.07.15 16:56:51 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.१५/०७/२०२३ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : S.P. Patil
Court : 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 15/07/2023
Order signed by
the Presiding Officer on : 15/07/2023
**Order uploaded on : 15/07/2023**

न. २ मयत झाले तरी दावेस

यामुळे सदर दावे कामी मयताचे वारस रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे.

कॉर्डवर आणणेकरिता विलंब झाला असलेमुळे विलंब माफ होऊन मिळणे

असाईड होऊन मिळणे आवश्यक आहे.

क मयत दादासाहेब बाबूराव तारदाळे हे दि. ०५/०९/२०२१ रोजी मयत कायदयानुसार मयताचे वारस रेकॉर्डवर आणणेकरिता ९० दिवसांचा व तदनंतर तेथुन पुढे ६० दिवसांच्या आत ॲबेटमेंट सेट असाईड करुन मुदत आहे. परंतु याकामी अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणेकरिता झाला असलेने, त्यासाठी विलंबमाफीचा अर्ज स्वतंत्र दाखल केलेला कोरोना (कोव्हीड-१९) या महामारीच्या संसर्गजन्य आजारामुळे संपूर्ण कडाऊन झालेला होता व त्याकाळात कोर्ट कामकाज देखील बरेच दिवस बाल मुळ वादी रावसाहेब बाबुराव तारदाळे हे देखील दि. ०१/०२/२०२० ले असलेने, तसेच त्यांची पत्नी छाया रावसाहेब तारदाळे ह्या आजारी पंत रावसाहेब तारदाळे यांचा अपघात झालेला आहे. त्यामुळे त्यांचे धोपचार चालू होते. त्यामुळे

विलंब झालेला आहे व कायद्याने अबेटमेंट सदरची अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणे आवश्यक झालेले आहे. सेट असाईड होऊन मिळणेककरिता जाणूनबुजून उशीर झालेला नसुन वर व झालेला आहे त्यामुळे सदर अबेटमेंट सेट असाईड होऊन वारस आवश्यक आहे.

रील सर्व कारणाचा विचार करणेत येवुन, या कामी न्यायाचे दृष्टीने नं. २ दादासो बाबूराव तारदाळे यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरित फ करणेत यावा व अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळावी ही न

अर्ज असे.